# बृहन्मुंबई महानगरपालिका

## माहिती तंत्रज्ञान विभाग

संचालक (मा.तं.वि.)/१७९९ /२०१८    दि. ०२/०१/२०१९

# परिपत्रक

**विषय :** बृहन्मुंबई महानगरपालिकेचे संकेतस्थळ अद्ययावत करण्याबाबत...

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नवीन संकेतस्थळ मार्च २०१७ रोजी सुरु करण्यात आले असुन सर्व विभाग / खाते यांच्या प्रतिनिधीमार्फत नवीन संकेतस्थळाची वापरकर्ता स्विकार चाचणी (User Acceptance Test, UAT) देखील घेण्यात आली आहे. महानगरपालिकेचे सर्व खाते, इस्पितळे, विभाग हे माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत त्यांच्या निविदा, दरपत्रिका, माहिती अधिकार अधिनियम माहितीपुस्तिका, परिपत्रके, जाहिराती, भरती संबंधीत पत्रके, प्रसिध्दी पत्रके, अहवाल इत्यादी कागदपत्रे मनपा संकेतस्थळावर वेळोवेळी प्रदर्शित करत असतात.

मनपा संकेतस्थळावर मोठया प्रमाणात अनावश्यक माहिती असल्याबाबत, माहिती अद्ययावत नसल्याबाबत, चुकीची माहिती प्रदर्शित केल्याबाबत व माहिती कालबाहय झाल्याबाबत अनेक तक्रारी नागरीकांमार्फत मा.तं. विभागामध्ये केल्या जातात. याबाबत वेळोवेळी माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत् सर्व विभाग व खाते यांना कळविले जाते.

संकेतस्थळावरील माहिती अद्ययावत करण्याची व कालबाहय माहिती काढुन टाकण्याची जबाबदारी संबंधीत खातेप्रमुख / विभागप्रमुख यांची आहे. व त्यासाठी कन्टेन्ट मॅनेजमेंट सिस्टीम (Content Management System) ही सुविधा देखिल मार्च २०१७ पासुन सर्व खाते व विभाग यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर प्रणालीमधून सर्व खाते व विभाग त्यांच्या विभागाशी संबंधीत माहिती संकेतस्थळावर अद्ययावत करु शकतात / काढुन टाकु शकतात. सदर प्रणालीचे प्रशिक्षण, आयडी व पासवर्ड यापुर्वीच सर्व खाते व विभाग यांना माहिती तंत्रज्ञान विभागाकडुन देण्यात आलेले आहे. तसेच याचा वापर करुन संबंधीत माहिती मनपा संकेतस्थळावर अद्ययावत करण्याबाबत माहिती तंत्रज्ञान विभागाने वेळोवेळी सर्व खाते / विभाग प्रमुखांना कळविले आहे.

तथापि, असे निदर्शनास आले आहे की, काही विभाग व खाते यांनी अद्याप वर नमूद प्रणालीचा वापर सुरु केलेला नाही आणि मनपा संकेतस्थळावर माहिती अद्ययावत केलेली नाही. करीता, आपणास कळविण्यात येते की, मनपाचे संकेतस्थळ हे अद्ययावत ठेवण्याकरीता, आपल्या खाते / विभागाची संपुर्ण अद्ययावत माहिती,

वर नमूद प्रणालीमधुन आपल्या स्तरावर अद्ययावत करण्यात यावी. तसेच संकेतस्थळावर असलेली अनावश्यक / कालबाहय माहिती काढुन टाकण्याकरीता वर नमूद प्रणालीचा वापर करावा अथवा मा.तं. विभागास mcgmportal.it@mcgm.gov.in या तात्काळ ईमेलआयडीवर कळविण्यात यावे.

पुढील तात्काळ कार्यवाहीकरीता अग्रेषित.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| १९/१२/२०१८ | २०/१२/२०१८ | २८/१२/२०१८ |
| **(श्री.अरुण जोगळेकर)** | **(श्री.सुधीर नाईक)** | **(श्री.विजय सिंघल)** |
| **संचालक (मा.तं.वि.)प्र.** | **सह आयुक्त (सा.प्र.)** | **अति. आयुक्त (पू.उ.)** |